मधुवार्ता

# व्यथा परागीभवन करणाऱ्या मधमाश्यांची!



**जगामध्ये २०,०७७ जातींच्या मधमाश्या आहेत. आपल्या आजच्या या आधुनिक शेती पद्धतीमुळे यापैकी ४० टक्के मधमाश्यांच्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. माणसांची लोकसंख्या मात्र दुप्पट- चारपट वाढली. या वाढलेल्या लोकसंख्येसाठी अन्नधान्य उत्पादन करण्यास मदत करणाऱ्या मधमाश्यांची संख्या वाढण्याऐवजी त्यांची संख्या ३७ टक्क्यांनी कमी झाली.**

**खरं** तर आता मधमाशीकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. मधमाशीने मानवाला मध हा पहिला गोड पदार्थ दिला, म्हणून तिला मधमाशी म्हटले जाते. पूर्वजांनी या मधमाशीला जपण्यासाठी अनेक चांगल्या गोष्टी केल्या होत्या. आपला मागील २०-३० वर्षांपूर्वीचा काळ बघितला तरी, लहानपणी मुलांसोबत बांधावरच्या कुपट्यामध्ये जाऊन तेथून मधमाशीचे पोळे असलेली फांदी तोडून आणायची आणि मधावर ताव मारायचा हे आठवतं. परंतु हरितक्रांतीनंतरची शेती म्हणा किंवा आमचा



हावरटपणा म्हणा- बांधावर झाडे, कुपाट्या राहिल्या नाहीत. कीटकनाशकांमुळे मधमाश्यांची संख्या कमी झाली. आता अगदी औषधाला म्हणूनही शेताच्या कडेवरच्या झाडांवर मधमाश्यांचे पोळे सापडत नाही. जगामध्ये २०,०७७ जातींच्या मधमाश्या आहेत. आपल्या आजच्या या आधुनिक शेती पद्धतीमुळे यापैकी ४० टक्के मधमाश्यांच्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. माणसांची लोकसंख्या मात्र दुप्पट- चारपट वाढली. या वाढलेल्या लोकसंख्येसाठी अन्नधान्य उत्पादन करण्यास मदत करणाऱ्या मधमाश्यांची संख्या वाढण्याऐवजी त्यांची संख्या ३७ टक्क्यांनी कमी झाली. जगामध्ये असलेल्या एकूण पिकांपैकी किंवा झाडांपैकी ९० टक्के पिकांच्या फुलांवर मधमाशी काम करते; तिच्या या सततच्या मेहनतीचे रुपांतर धान्य, फळे, भाजीपाला किंवा मानवाला आवश्यक असलेल्या अन्नात होत असते. परंतु याचा आपण कधीही विचार करत नाही. लोकसंख्या वाढत असताना अन्नधान्याची गरज वाढणार आहे. अशा परिस्थितीमध्ये मधमाश्यांची संख्या कमी झाली तर परागीभवनाची क्रिया कशी होणार, याचा कोणीही विचार करत नाही. कृषी उत्पादन का घटले याचा अतिशय गांभीर्याने विचार केला पाहिजे.

**मध उत्पादनापेक्षाही परागीभवन महत्त्वाचं**

पृथ्वीतलावर अशी अनेक पिके आहेत की, ज्यांचे परागीभवन झाले नाही तर ती पिके उत्पादनच देणार नाहीत आणि नंतरच्या काळात तर ती पिकेच नष्ट होतील! मागील ५० वर्षांमध्ये म्हणजे हरितक्रांती झाल्यानंतर पिकांच्या परागीभवनाची गरज ३०० टक्क्यांनी वाढल्याचा निष्कर्ष एका संशोधनातून पुढे

आला आहे. नैसर्गिक परागीभवन करणारी यंत्रणा मानवानेच आज संपवल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. पुढील ५० वर्षांत या विषयावर काहीच उपाय केले नाहीत तर काय होईल याचा विचारच न केलेला बरा! मधमाशीबद्दल बोलताना आपल्या देशात फक्त चर्चा होते ती मधाचे किती उत्पादन घेतले याची! जगामध्ये सध्या जवळ जवळ ८.१० कोटी मधमाश्यांच्या वसाहती असून, त्यापासून १६ लाख टन मधाचे उत्पादन घेतले जाते. अर्थात या वसाहतींपैकी मोठ्या प्रमाणात मधमाश्यांच्या वसाहती परागीभवनासाठी भाडेतत्त्वावर शेतकऱ्यांना पुरवल्या जातात. मधाच्या उत्पादनापेक्षा परागीभवनाच्या व्यवसायातून मधपाळांना जास्त पैसा तर मिळतोच; पण परागीभवन झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पीक उत्पादनात कितीतरी पटीने वाढ होते. आपल्या देशात ३५ लाखांपर्यंत मधमाश्यांच्या वसाहती असून, मधाचे उत्पादन फक्त १.३० लाख टन आहे. म्हणजे मध उत्पादन क्षमता अत्यंत कमी. दुसरी अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या देशात मधमाशी पालन बव्हंशी मध उत्पादनासाठीच केले जाते. उपलब्ध मधमाश्यांच्या वसाहतींपैकी अगदी नगण्य प्रमाणातील मधमाश्यांच्या वसाहती परागीभवनासाठी वापरल्या जातात. म्हणजे आपण मध उत्पादनामध्ये मागे तर आहोत परंतु मधमाशीद्वारे परागीभवनाला तर सुरुवातही केली नाही. (या विवेचनात महाराष्ट्राचा विचार करत नाही, कारण या दोन्ही बाबींमध्ये आपला कुठे नंबरच लागत नाही. महाराष्ट्र देशाच्या नकाशावर मध उत्पादनात दिसतच नाही. मग परागीभवनाद्वारे शेती उत्पादन वाढीसाठी मधमाशी पालन हा विषय तर सोडाच!)

**मधमाशी ही प्रमुख कृषी निविष्ठा मानली पाहिजे**

भविष्यामध्ये वाढत असलेल्या लोकसंख्येला खायला अन्न तसेच मानवी आरोग्य जपण्यासाठी आवश्यक असलेली ऊर्जा, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा संतुलित प्रमाणात पुरवठा करायचा असेल तर पिकांच्या परागीभवनासाठी मधमाशी पालन हा विषय महाराष्ट्रातील शेती क्षेत्रामध्ये आघाडीवर असला पाहिजे. शेती उत्पादन वाढीसाठी बी- बियाणे, खते, औषधे या निविष्ठांपुरताच विचार न करता मधमाशीला यामध्ये अग्रक्रम द्यावा लागणार आहे. याचे कारण इतर निविष्ठा वापरूनही उत्पादन पाहिजे त्या प्रमाणात वाढत नाही. परंतु मधमाशीचा वापर केला तर २५ ते ३० टक्के पिकांचे उत्पादन वाढण्याची नक्कीच हमी आहे. याची सर्व कल्पना कृषी विद्यापीठे, कृषी विभाग, कृषीविषयक संशोधन केंद्रे यांना असूनही पाहिजे त्या प्रमाणात त्यांच्याकडून या बाबींचा



गांभीर्याने विचार होताना दिसत नाही. अर्थात अशी परिस्थिती जास्त दिवस टिकून राहणार नाही कारण प्रत्येक गोष्टीला उत्तर हा काळच देत असतो. हे बघता पुढील पाच-दहा वर्षांचा काळ नक्कीच मधमाशी पालनाचा आहे, ज्यावेळी सर्व यंत्रणा या विषयावर काम करताना दिसतील.

माणसासह इतर सजीवांचीही भूक भागवणाऱ्या बळीराजाचं पीक फुलवण्याचं- ते वाढवण्याचं काम प्रामुख्याने मधमाशी परागीभवनाद्वारे करत असते. तिचं हे अत्यंत मोलाचं काम आपल्याकडून दुर्लक्षित राहतं ही मधमाशीची म्हणजेच पर्यायाने मधमाशी पालन व्यवसायाचीही व्यथा आहे. ही व्यथा जाणून घेणं, ती दूर करण्याचा प्रयत्न करणं अंतिमत: माणसाच्याच हिताचं आहे.

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**